# पशुसंवर्धन विभाग

## विभागाची उद्दिष्ट व ध्येय

तांत्रिक कामाचे उद्दिष्ट १००% पूर्ण केले जाते.शेतकऱ्यांच्या आजारी जनावरांवर वेळेत औषधोपचार करुन मौल्यवान जनावरांचा जीव वाचविणे,तसेच निरनिराळया रोगांवर प्रतिबंधक लसीकरण करणे,माजावर आलेल्या गार्यीवर कृत्रिम रेतन करुन संकरीत वासरांची पैदास करणे,विविध पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणे.

**महत्वाच्या व्यक्ती व त्यांचे कार्यक्षेत्र**

| अ.क्र. | व्यक्ती | नांव | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | मा.सचिव,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय,मुंबई -३२ | मा.श्रीमती मेघा गाडगीळ (भा.प्र.से.) | महाराष्ट्र राज्य |
| २ | मा.आयुक्त,पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य,पुणे -१ | मा.श्री.आशिश शर्मा (भा.प्र.से.) | महाराष्ट्र राज्य |
| ३ | मा.प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नाशिक विभाग,नाशिक | डॉ.म.मोईनोद्दिन | नाशिक विभाग |
| ४ | मा.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | मा.डॉ.सुनिल के.तुंबारे | अहमदनगर जिल्हा |

| विभागाची रचना | | |
|---|---|---|
| **जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जिल्हा परिषद,अहमदनगर** | | |
| पंचायत समिती (तालुका प्रमुख) | तालुक्यातील पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.१ | तालुक्यातील पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.२ |
| पशुधन विकास अधिकारी (विस्तार) | पशुधन विकास अधिकारी (प्रमुख) | १.सहाय्यक पशुधन विकास अधिकारी (प्रमुख) किंवा २.पशुधन पर्यवेक्षक (प्रमुख) |
| पशुधन पर्यवेक्षक (मदतनीस) | व्रणोपचारक (मदतनीस) | परिचर(मदतनीस) |
| | परिचर (मदतनीस) | |

## क्षेत्रिय कार्यालयाची जबाबदारी (ध्येय व उद्दिष्टे)

- **पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती :-**

१.तालुक्यातील शेतकऱ्यांकरीता विविध प्रशिक्षण योजना राबवून पशुसंवर्धन विषयक माहिती देणे.
२.रोग प्रार्दुभाव नियंत्रणात आणणेसाठी सर्व जनावरांना लसीकरण करुन घेणे.
३.विविध कार्यमोहिमा व शिबीरे,वंध्यत्व निवारण शिबीरे आयोजित करणे,विविध योजना राबविणे, माहिती व जनसंपर्क अभियान राबविणे.
४.दुग्धस्पर्धांचे आयोजन करणे.
५.वैरणविकास कार्यक्रम राबविणे.
६.सर्व योजना व तांत्रिक कामकाजाचे अहवाल दरमहा वरिष्ठ कार्यालयास सादर करणे

- **पशुधन विकास अधिकारी,पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी १ :-**

१.पशुवैद्यकिय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील आजारी जनावरांची,वांझ जनावरांची तपासणी, गर्भधारणा, तपासणी करुन आवश्यक तो औषधोपचार करणे.
२.दवाखान्याचे कार्यक्षेत्रात जनावरांमध्ये संसर्गजन्य रोगाचे निदान करुन औषधोपचार/लसीकरण करणे व साथीच्या रोगाला आळा घालणे.
३.मयत जनावरांचे शवविच्छेदन करुन रोगनिदान करणे.
४.दवाखान्यात येणाऱ्या/कार्यक्षेत्रातील जनावरांवर आवश्यकतेप्रमाणे लहान-मोठया शस्त्रक्रिया करणे.
५.पशुविस्तार कार्यक्रमाचे अनुषंगाने पशुप्रदर्शने भरविणे,रोगनिदान शिबीरे पार पाडणे,दुग्धस्पर्धांचे आयोजन करणे.
६.खात्याच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी प्रसंगानुरूप ऐनवेळी पशुसंवर्धन कामाच्या दृष्टिने आवश्यक अशा नेमून दिलेल्या बाबींची पूर्तता करणे.

- **सहाय्यक पशुधन विकास अधिकारी / पशुधन पर्यवेक्षक प.वै.द.श्रेणी १/२ /पंचायत समिती :-**

१.दवाखान्यात येणाऱ्या जनावरांना औषधोपचार/कृत्रिम रेतन करणे.
२.दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील रोगाचे प्रादुर्भाव वेळीच लसीकरण करुन नियंत्रीत करणे.
३.पवैद श्रे.१ मधील पविअ यांचे मार्गदर्शनानुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करणे.
४.पविअ वेळोवेळी देतील त्या सूचनेप्रमाणे योजनांची अंमलबजावणी करणे.
५.खात्याच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी प्रसंगानुरूप ऐनवेळी पशुसंवर्धन कामाच्या दृष्टिने आवश्यक अशा नेमून दिलेल्या बाबींची पूर्तता करणे.

**महत्वाच्या सेवा व धोरणाकरीता संपर्काची माहिती :-**

❖ **जिल्हास्तर** :- जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जिल्हा परिषद,अहमदनगर फोन नं.२३५३६९७
❖ **तालुकास्तर** :- पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती.
❖ **पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.१** :- पशुधन विकास अधिकारी,पशुवैद्यकिय दवाखाना
❖ **पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.२** :- सहा.पशुधन विकास अधिकारी,/पशुधन पर्यवेक्षक, पशुवैद्यकिय दवाखाना

**शासननिर्णय/परिपत्रके** :- संकलने अद्यावत ठेवली आहेत.
**खात्यामधील योजना** :- सोबत योजना निहाय तक्ता जोडला आहे.

## केंद्र पुरस्कृत योजना

१. माहिती व जनसंपर्क अभियान (I.E.C.)
२. लाळखुरकूत रोगमुक्त पट्टा निर्मिती कार्यक्रम.( F.M.D.C.P.)

## राज्य पुरस्कृत योजना

### अ)बिगर आदिवासी योजना

१.शेतक-यांच्या क्षेत्रावर वैरण उत्पादनासाठी १०० टक्के अनुदानावर बियाणांचा पुरवठा करणे
२.पशुवैद्यकिय दवाखान्यांची स्थापना व बळकटीकरण करणे.
३.पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.२ यांचा दर्जावाढ करणे.
४.पवैद/पशुप्रथमोपचार केंद्रासाठी निवासी/बिगरनिवासी इमारतींचे बांधकाम करणे.
५.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयाचे बळकटीकरण करणे.
६.पशुवैद्यकिय संस्थांना जीवरक्षक औषधांचा पुरवठा करणे.

### ब)बिगर आदिवसी योजना (अनुशेषांतर्गत योजना)

१.पशुवैद्यकिय संस्थांची स्थापना करणे.

### क)आदिवासी उपयोजना

१.गायी व म्हशींमध्ये वंध्यत्व शिबीरांचे आयोजित करणे.
२.अनुसुचित जमातीच्या लाभधारकांना ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप करणे.
३.अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर शेळयांचे गट वाटप करणे.
४.पशुवैद्यकिय संस्थांना जीवरक्षक औषधांचा पुरवठा करणे.
५.अनुसुचित जमातीच्या लाभधारकांना तलंगाचे गट वाटप करणे.

### ड)आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना

१.गायी व म्हशींमध्ये वंध्यत्व शिबीरांचे आयोजित करणे.
२.पशुवैद्यकिय संस्थांना जीवरक्षक औषधांचा पुरवठा करणे.
३.अनुसुचित जमातीच्या लाभधारकांना तलंगाचे गट वाटप करणे.
४.अनुसुचित जमातीच्या लाभधारकांना दुधाळ जनावरांचे गट वाटप करणे.

### इ)विशेष घटक योजना

१.अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप करणे.
२.अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थींच्या दुधाळ जनावरांना १०० टक्के अनुदानावर खाद्य पुरवठा करणे.

### ई)पश्चिम घाट विकास योजना

१.पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.२ कळस ता.अकोले कार्यक्षेत्रातील जनावरांना पशुवैद्यकिय सेवा पुरविणे.

**जिल्हा परिषद सेस योजना**

१.जिल्हा परिषदेची ११ पशुउपचार केंद्रे चालविणे.
२.कुत्रे चावलेल्या जनावरांना मोफत लस पुरवठा करणे.
३.पशुवैद्यकिय इमारती दुरुस्तीसाठी व नविन दवाखाने बांधण्यासाठी अर्थसहाय्य.
४.जिल्हा परिषदेच्या पशुवैद्यकिय संस्थांना सुविधा पुरविणे.
५.शेळया मेंढया व संकरीत जनावरांना अ जीवनसत्व,मिनरल मिश्रणे,खनिजे व इतर औषधे पुरविणे.
६.शेळया मेंढया व संकरीत जनावरांकरीता जंतनिर्मुलन कार्यक्रम व इतर औषधे पुरविणे.
७.जिल्हयातील जनावरांना गोचिड निर्मुलन कार्यक्रमांतर्गत औषध पुरवठा करणे.
८.जिल्हयातील जनावरांना साथीच्या रोगावर नियंत्रण करण्यासाठी व इतर औषधे पुरविणे.
९.लाळखुरकूत रोगावर औषधोपचारासाठी औषधे पुरविणे.
१०.जिल्हयातील पशुवैद्यकिय दवाखान्यांना नगरपालीका पाणीपट्टी साठी अनुदान.

**नागरीकांची सनद**

जिल्हयातील प्रत्येक पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.१ व श्रे.२ मध्ये लावण्यात आलेली आहे.

**महत्वाचे अहवाल**

मासिक/त्रैमासिक/वार्षिक (तांत्रिक व नियोजन) नियमितपणे वरीष्ठांना सादर केले जातात.

**परफॉरमन्स बजेट** (कार्यक्रम अंदाजपत्रक)

कार्यक्रम अंदाजपत्रकातील उद्दिष्टांप्रमाणे दरवर्षी काम केले जाते.

## जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेमार्फत विविध योजनांतर्गत पशुसंवर्धन विभागास खालीलप्रमाणे तसेच मागणीप्रमाणे सुविधा पुरविण्यात येतात.

१.पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.१ व श्रे.२ चे नविन बांधकाम करणे.

२.पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.१ व श्रे.२ करीता कृत्रिम रेतनासाठी लागणाऱ्या सामुग्रीचा पुरवठा करणे.

३.पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.१ व श्रे.२ करीता शितपेटयांचा पुरवठा करणे.

४.पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.१ व श्रे.२ करीता खच्चिकरण चिमटयांचा पुरवठा करणे.

५.पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.१ व श्रे.२ करीता लोखंडी खोडे पुरवठा करणे.

६.पशुवैद्यकिय दवाखाना श्रे.१ व श्रे.२ करीता सुक्ष्मदर्शक यंत्रांचा पुरवठा करणे.

वरील सर्व सुविधा जिल्हयातील दारीद्रय रेषेखालील असलेल्या गोपालकांच्या जनावरांसाठी पशुवैद्यकिय सेवा पुरविण्यासाठी उपयोग केला जातो.

जिल्हयात एकुण २३१ पशुवैद्यकिय संस्था असून त्यापैकी ८१ संस्था श्रे.१ च्या असून १४९ संस्था श्रे.२ च्या आहेत तसेच राजुर ता.अकोले येथे एक फिरते पशुवैद्यकिय चिकित्सालय कार्यरत आहे.अशा एकुण २३१ पशुवैद्यकिय संस्थामार्फत जिल्हयातील शेतकऱ्यांच्या जनावरांना पशुवैद्यकिय

सेवा पुरविण्याचे कामकाज केले जाते.जिल्हयातील पशुवैद्यकिय दवाखान्याचे तांत्रिक कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक पंचायत समिती स्तरावर एक पशुधन विकास अधिकारी (विस्तार) कार्यरत आहे.असे एकुण १४ पदे आहेत.

तसेच कुक्कुट प्रकल्प कोपरगांव येथे बेरोजगारांना १५ दिवसांचे कुक्कुटपालन प्रशिक्षण शिबीरे दरमहा घेतले जातात तसेच जिल्हयातील शेतकऱ्यांना सुधारीत जातीच्या कोंबडयांची उबवणूकीची अंडी वाटप केली जातात.